नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - २०५<br>Issue - 205 | वार सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५<br>Blow- Monday Date 15 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर

## चंद्र-सूर्य असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राचीच राहणार; मुख्यमंत्री फडणवीस रोखठोक बोलले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर: 'महाराष्ट्र गुंतवणुकीत देशात आघाडीवर आहे. लाडकी बहीणसारख्या कल्याणकारी योजना राबवूनही राज्याची अर्थव्यवस्था दिवाळखोरीकडे गेलेली नाही. कर्ज उभारणीही केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या निकषांतच आहे,' असे ठाम प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर रविवारी केले. तसंच मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होईल, या आरोपांना त्यांनी ठाम शब्दांत नकार दिला. 'चंद्र-सूर्य असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राचीच राहणार,' असं स्पष्ट करत त्यांनी मुंबई महाराष्ट्राची असल्याचा पुनरुच्चार केला.

विरोधकांनी सादर केलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत तब्बल ४७ आमदारांनी सहभाग घेतला. गेल्या एका वर्षात अनेक आव्हाने आली, मात्र राज्य सरकारने त्यांचा यशस्वीपणे सामना केला. करोना, नैसर्गिक आपत्ती, आर्थिक संकटे असूनही महाराष्ट्र प्रगतीपथावर राहिला. 'अब आगे बढ़ चुका हूं मैं पीना था जितना ज़हर पी चुका हूं मैं,' अशा शब्दांत त्यांनी विरोधकांच्या टीकेला उत्तर देत पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त केला. गुंतवणुकीबाबत त्यांनी सांगितले की, २०२२ ते २०२५ या काळात १७ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीचे करार झाले असून त्यापैकी ७५ टक्के अंमलबजावणीत आले आहेत. एकट्या महाराष्ट्रात देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ३१ टक्के गुंतवणूक झाली असून परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. एक लाख कोटी रुपयांहून अधिक एफडीआय राज्यात आला आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि मागास भागांमध्येही मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढली आहे. गडचिरोली, विदर्भात सर्वाधिक गुंतवणूक होत असून इलेक्ट्रिक वाहन निर्मितीत ५० हजार कोटी, वस्त्रोद्योगात हजार कोटी, कृषी क्षेत्रात अडीच हजार कोटींची गुंतवणूक झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिली.

राज्याच्या विकासासाठी कर्ज उभारणी आवश्यक असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २५ टक्क्यांपर्यंत कर्ज घेण्याची मुभा असताना २०२५-२६ च्या अंदाजपत्रकानुसार केवळ १८.९७ टक्केच कर्ज उभारण्यात आले आहे. लाडकी बहीण योजना राबवूनही वित्तीय तूट ३ टक्क्यांच्या आत ठेवण्यात आली असून महसुली तूटही सीएजीच्या सर्व अटींनुसार मर्यादेत आहे. असे सांगत 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना कधीही बंद होणार नाही, असा विश्वास त्यांनी दिला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सीबीएससी अभ्यासक्रमात आता २१ पानांचा छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समाविष्ट करण्यात आला असून पूर्वीच्या तुलनेत मुघल इतिहासाचे प्राबल्य कमी झाले आहे.

गेल्या तीन वर्षांत राज्य सरकारने १ लाख २० हजार सरकारी नोकऱ्या दिल्या आहेत. मिहानमध्ये ३१ कंपन्या कार्यरत असून आणखी २२ कंपन्या सुरू होत आहेत. येथे १ लाख २७ हजारांहून अधिक रोजगार निर्माण झाले आहेत. कायदा-सुव्यवस्थेच्या बाबतीत इतर गुन्ह्यांमध्ये घट झाली असून दोषसिद्धीचे प्रमाण ९६ टक्क्यांवर पोहोचल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. महिलांवरील गुन्हे वाढले असले तरी यामागे नोंदणी वाढल्याचे कारण असून, ६० दिवसांत आरोपपत्र दाखल करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

...णावर मदत देण्यात आली असून ९२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात थेट १५ हजार ७०० कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. कापूस खरेदीत कोणत्याही शेतकऱ्याचा कापूस परत जाणार नाही, अशी हमीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

-शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी २६ हजार ६८१ कोटी रुपये ... कर्जमाफीचा लाभ शेतकऱ्यांना व्हावा, बँकांना नव्हे.

-सिंचन अनुशेष जवळपास संपला असून विदर्भ आणि मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने काम सुरू आहे. वैनगंगा-नळगंगा हा एक लाख कोटींचा प्रकल्प विदर्भासाठी मैलाचा दगड ठरेल, असे त्यांनी सांगितले.

# बिहारचे मंत्री नितीन नबीन भाजपचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाच्या गोटातून एक मोठी बातमी समोर येत आहे. भाजपने नवीन राष्ट्रीय अध्यक्षांची घोषणा केली आहे. बिहार सरकारचे मंत्री नितीन नबीन यांची पक्षाचे नवे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जे पी नड्डा यांचा अध्यक्षपादाचा कार्यकाळ संपला आहे. त्यानंतर आता नितीन नवीन हे पक्षाच्या जबाबदाऱ्या स्वीकारतील. याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीसांनी जारी केलेल्या पत्रात म्हटले आहे की, भारतीय जनता पक्षाच्या संसदीय मंडळाने बिहार सरकारमधील मंत्री नितीन नबीन यांची भाजपचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळं आता भाजपला नवीन अध्यक्ष मिळाले आहेत. भाजप अध्यक्ष हे संविधानिक किंवा सरकारी पद नाही. त्यामुळे त्यांना सरकारकडून कोणतेही वेतन दिले जात नाही. त्याऐवजी पक्ष स्वतः आपल्या निधीतून पगार आणि इतर सुविधा देतो.

**भाजपची मोठी घोषणा**

**नितीन नबीन हे एक तरुण नेते, त्यांना समृद्ध संघटनात्मक अनुभव आहे : पंतप्रधान नरेंद्र मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नितीन नबीन यांना भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन केले. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर केली आहे. नितीन नबीन यांनी स्वतःला एक मेहनती भाजप कार्यकर्ता म्हणून स्थापित केले आहे. ते एक तरुण, समर्पित आणि संघटनात्मकदृष्ट्या अनुभवी नेते आहेत. ज्यांचा बिहारमध्ये आमदार आणि मंत्री म्हणून अनेक कार्यकाळात प्रभावी कामगिरी आहे. त्यांनी लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी पूर्ण समर्पण आणि वचनबद्धतेने काम केल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

भारतीय जनता पक्षाचे अध्यक्षपद हे पक्षाच्या संविधानानुसार दिलेल्या प्रक्रियेद्वारे निवडले जाते. ही प्रक्रिया खालीलप्रमाणे असते:

प्रत्येक राज्यात राज्य कार्यकारिणी तयार केली जाते. त्या कार्यकारिणीतून राष्ट्रीय प्रतिनिधी निवडले जातात. हे राष्ट्रीय प्रतिनिधी पुढे राष्ट्रीय कार्यकारिणीत सहभागी होतात. राष्ट्रीय अध्यक्षाची निवड ही या राष्ट्रीय प्रतिनिधींच्या मतांवरून होते.

निवडणुकीसाठी निवडणूक प्रभारी नेमला जातो. अर्ज, नामनिर्देशन, मतमोजणी ही प्रक्रिया त्यांच्या देखरेखीखाली पार पडते. बहुतेक वेळा पक्षांतर्गत एकता आणि सहमतीच्या आधारे एकमेव उमेदवाराच्या नावावर एकमुखी निवड होते. त्यामुळे प्रत्यक्ष मतदानाची गरज पडत नाही.

# टीम इंडियाचा सलग दुसरा विजय; सेमी फायनलमध्ये दणक्यात एन्ट्री




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुबई: क्रिकेटच्या मैदानावर भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे. भारत आणि पाकिस्तानचा सामना रंगला. या सामन्याचे नाणेफेक हे पाकिस्तानने जिंकले पम सामना जिंकण्यात अपयश आले. एसीसी पुरुष अंडर-१९ आशिया कप २०२५ च्या पाचव्या सामन्यात, भारतीय संघाने पाकिस्तानला ९० धावांनी पराभवाचा झटका दिला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २४० धावा केल्या आणि विरोधी संघाला २४१ धावांचे लक्ष्य दिले. परंतु, या छोट्या धावसंख्येचा पाठलाग करताना पाकिस्तानी फलंदाजांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला. भारताने १९ वर्षांखालील आशिया कप २०२५ मध्ये पाकिस्तानचा ९० धावांनी पराभव केला. दुबई येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात टीम इंडियाने ४६.१ षटकांत २४० धावा केल्या. आरोन जॉर्जने सर्वाधिक ८५ धावा केल्या, तर कनिष्क चौहानने ४६ धावा केल्या. त्यानंतर दीपेश देवेंद्रन आणि कनिष्क चौहान यांनी प्रत्येकी तीन बळी घेत पाकिस्तानला १५० धावांत गुंडाळले. पाकिस्तानने फक्त ४१.२ षटकांतच विजय मिळवला. पहिल्या सामन्यात युएईला हरवल्यानंतर भारताचा हा सलग दुसरा विजय आहे. या निकालासह भारताने उपांत्य फेरीत स्थान निश्चित केले.

भारत आणि पाकिस्तानमधील सामन्यात पावसाने व्यत्यय आणला आणि सामना प्रत्येकी ४९ षटकांत कमी केला. टीम इंडियाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित करण्यात आले. पाच धावा काढल्यानंतर वैभव सूर्यवंशी लवकर बाद झाला. तथापि, कर्णधार आयुष म्हात्रे (३८) आणि जॉर्ज यांनी ४९ धावांची भागीदारी करत डाव सावरला. म्हात्रे २५ चेंडूत ३८ धावा करून बाद झाला, त्याने चार चौकार आणि तीन षटकार मारले. त्यानंतर भारताच्या विकेट पडत राहिल्या. जॉर्जने एका टोकाला सांभाळले. त्याने ८८ चेंडूत १२ चौकार आणि एक षटकार मारत ८५ धावा केल्या. सातव्या क्रमांकावर खेळणाऱ्या कनिष्कने २५ चेंडूत दोन चौकार आणि तीन षटकार मारत ४६ धावा केल्या.

# 'प्रोजेक्ट महादेव' या राज्यस्तरीय क्रीडा उपक्रमाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: 'प्रोजेक्ट महादेव' या राज्यस्तरीय क्रीडा उपक्रमाचे उद्घाटन फुटबॉल जगतातील महान खेळाडू लिओनेल मेस्सीच्या हस्ते झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकारने हा उपक्रम सुरू केला आहे. या प्रकल्पासाठी ६० खेळाडूंची निवड झाली आहे. वानखेडे स्टेडियमवर हा दैदीप्यमान कार्यक्रम पार पडला, यावेळी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरदेखील उपस्थित होता.

यावेळी देशातले अनेक सुपरस्टार्स, राजकारणीही पाहायला मिळाले. टायगर श्रॉफ, अजय देवगण यांसारखे अनेक दिग्गज उपस्थित होते. यावेळी चाहत्यांनीही प्रचंड गर्दी केली होती. महाराष्ट्र सरकारचा 'प्रोजेक्ट महादेव' हा एक महत्त्वाकांक्षी क्रीडा उपक्रम आहे. या उपक्रमाचा उद्देश राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर घडवणे हा आहे. या प्रकल्पासाठी देशभरातून ६० प्रतिभावान खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या खेळाडूंना उत्कृष्ट प्रशिक्षण आणि सुविधा पुरवल्या जाणार आहेत. दरम्यान, मेस्सीच्या आगमनाने खेळाडू आणि चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला होता. या उद्घाटन सोहळ्याला क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर खास उपस्थित होता. त्याने यावेळी मेस्सीला खास गिफ्टही दिलं आहे. ते म्हणजे संपूर्ण जगाला प्रिय असणार्या १० क्रमांकाची त्याची जर्सी. सचिनने त्याची स्वाक्षरी असलेली ही जर्सी मेस्सीला वानखेडे मैदानावर गिफ्ट दिली. दरम्यान, लियोनेल मेस्सीनेही लगेचच मास्टर ब्लास्टरला फिफा विश्वकप सामन्यांमधला त्याची स्वाक्षरी केलेला फुटबॉल गिफ्ट केला आहे. हा क्षण पाहताच क्रिडा प्रेमींनी एकच जल्लोष केला.

दरम्यान, यावेळी सचिनने त्याचं खास मनोगतही व्यक्त केलं. विशेष बाब म्हणजे सचिन यावेळी मराठीतून बोलला. तो म्हणाला, कसंकाय मुंबई, आपण मुंबईत आहोत. तुम्हा सर्वांनी मेस्सीचं जे खास स्वागत केलं आहे, त्यासाठी धन्यवाद. मुंबई स्वप्न पूर्ण करणारी नगरी आहे. मी वानखेडेवर अनेक अविस्मरणीय क्षण अनुभवले आहेत. याच मैदानावर अनेक स्वप्नांनी आपली ध्येयरेषा गाठली. तुमच्या पाठिंब्याशिवाय २०११ साली या मैदानावर आपण तो सुवर्णक्षण अनुभवू शकलो नसतो. आज मुंबईत या तिघांनी एकत्र उपस्थित असणं हा क्षणही खास झाला आहे. मी मेस्सीबद्दल काय बोलू, त्याच्या खेळाबद्दल बोलण्यासाठी हे योग्य व्यासपीठ नाही.. त्याने काय साध्य केलेलं नाही? सर्वकाही मिळवलं आहे. त्याच्या कारकीर्दीत त्याने जे काही मिळवलं आहे ते सर्व मेहनतीच्या जोरावर, त्याच्या मेहनत, जिद्द आणि समर्पणाचं कौतुक. मी मेस्सीला आणि त्याच्या कुटुंबाला चांगले आरोग्य लाभो अशा शुभेच्छा देतो तसेच सर्वांचे आभार मानतो, तू इथे आलास आमच्या खेळाडूंना प्रेरणा दिलीस त्यासाठी धन्यवाद. तुझ्या खेळाकडे पाहून भारतातले फुटबॉलपटूही उत्कृष्ट कामगिरी करतील, अशी मला खात्री आहे.

बोगस गोरक्षकांच्या नावाखाली होणाऱ्या लुटमारीवर आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाची मदत घेणार


'तिजोरी ओसंडून वाहत नाही', अजित पवार विधानसभेत दिले उत्तर

# गोशाळांमध्ये ठेवलेल्या भाकड गायींसाठीच राज्य सरकार अनुदान देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : भाकड जनावरांच्या संगोपनासाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानावरून विधानसभेत रविवारी सविस्तर चर्चा झाली. गोशाळांमध्ये ठेवलेल्या भाकड गायींसाठीच अनुदान दिले जाईल, थेट प्रत्येक शेतकऱ्याला निधी देणे शक्य नाही, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केलं. तसेच राज्याची तिजोरी ओसंडून वाहत नाही, असंदेखील रोखठोक मत अजित पवार यांनी व्यक्त केलं. आमदार रोहित पवार, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राज्यात गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे शेतकऱ्यांकडील भाकड जणावरांची संख्या वाढत असल्याचा मुद्दा प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला. यावर बोलताना आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारने २२२ कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल समाधान व्यक्त करत भाकड गायींसाठी शासकीय जागांवर कुरणे विकसित करता येतील का? असा सवाल उपस्थित केला. राज्यात भाकड जनावरांची संख्या किती आहे? याची माहितीही त्यांनी मागितली. त्यावर पशुपालन मंत्री पंकजा मुंडे यांनी उत्तर दिलं.

भाकड जनावरे पाळणे शेतकऱ्यांसाठी कठीण असले तरी महाराष्ट्र देशात सर्वाधिक अनुदान देतो. गोवंशाचे शेण, गोमूत्र शेतीसाठी उपयुक्त असल्याने गोवंशाच्या संगोपनासाठी सरकार संवेदनशील असून अधिक सुधारणा करण्याचा विचार सुरू आहे, अशी प्रतिक्रिया पंकजा मुंडे यांनी दिली.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावर भूमिका मांडली. राज्यात एक कोटींपेक्षा अधिक शेतकरी असून प्रत्येकाकडे भाकड जनावरे आहेत. जर प्रत्येकाने जनावरे दाखवून निधी मागितला तर मोठा आर्थिक भार पडेल. त्यामुळे गोशाळांमार्फतच ही योजना राबवली जात आहे. बोगस गोरक्षकांच्या नावाखाली होणाऱ्या लुटमारीवर आळा घालण्यासाठी पोलिस यंत्रणेला विश्वासात घेऊन कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भाकड गायीसाठी प्रतिदिन ५० रुपये

आमदार विजय वडेट्टीवार यांनी मात्र सरकारवर टीका करत भाकड जनावरांचा शेतकऱ्यांना थेट उपयोग होत नसल्याचे सांगितले. विक्रीवर निर्बंध घालण्यात येतात, पण पर्यायी उपाय दिले जात नाहीत, असा आरोप त्यांनी केला. गोरक्षणाच्या नावाखाली काही जण शेतकऱ्यांची लूट करत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. यावर उत्तर देताना मंत्री पंकजा मुंडे यांनी भाकड जनावरांबाबत सरकारची भूमिका संवेदनशील असल्याचे स्पष्ट केले. शेतकऱ्यांकडील भाकड गायी संगोपनासाठी गोशाळेत ठेवण्यात येतात आणि या गायींच्या संगोपनासाठी गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी देशी गायींसाठी प्रतिदिन ५० रुपये अनुदान दिले जाते, अशी माहिती त्यांनी दिली. गोवंश बंदी कायदा लागू असून गाय-बैलांचे गोमूत्रही उपयोगात आणण्याबाबत सकारात्मक विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, आमदार अमोल खताळ यांनी गोशाळांची संख्या वाढविण्याची मागणी केली. आमदार डॉ. संजय कुटे यांनी शेतकरी कधीच गायींना कोंबून नेत नाहीत, तर शेतकऱ्यांच्या नावाखाली गोतस्करच गैरप्रकार करतात, असा मुद्दा मांडला. यावर मंत्री पंकजा मुंडे यांनी चुकीच्या पद्धतीने जनावरांवर अत्याचार करणाऱ्यांवरच कारवाई केली जाईल, असे सांगितले.

दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यातील गळनिंब येथे कथित गोरक्षकांच्या मारहाणीत एका मुलाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणावर आमदार हेमंत ओगले यांनी न्यायाची मागणी केली. आमदार कैलास पाटील यांनी गायींसोबत म्हशींनाही अडविले जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला. गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी याबाबत माहिती घेण्यात येईल, असे सांगितले, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सभागृहाला दिली.

## संपादकीय....

### देशात प्रथम

'महाराष्ट्र गुंतवणुकीत देशात आघाडीवर आहे. लाडकी बहीणसारख्या कल्याणकारी योजना राबवूनही राज्याची अर्थव्यवस्था दिवाळखोरीकडे गेलेली नाही. कर्ज उभारणीही केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या निकषांतच आहे,' असे ठाम प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर रविवारी केले. तसंच मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होईल, या आरोपांना त्यांनी ठाम शब्दांत नकार दिला. 'चंद्र-सूर्य असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राचीच राहणार,' असं स्पष्ट करत त्यांनी मुंबई महाराष्ट्राची असल्याचा पुनरुच्चार केला. विरोधकांनी सादर केलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत तब्बल ४७ आमदारांनी सहभाग घेतला. गेल्या एका वर्षात अनेक आव्हाने आली, मात्र राज्य सरकारने त्यांचा यशस्वीपणे सामना केला. करोना, नैसर्गिक आपत्ती, आर्थिक संकटे असूनही महाराष्ट्र प्रगतीपथावर राहिला. 'अब आगे बढ़ चुका हूं मैं पीना था जितना ज़हर पी चुका हूं मैं,' अशा शब्दांत त्यांनी विरोधकांच्या टीकेला उत्तर देत पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त केला. गुंतवणुकीबाबत त्यांनी सांगितले की, २०२२ ते २०२५ या काळात १७ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीचे करार झाले असून त्यापैकी ७५ टक्के अंमलबजावणीत आले आहेत. एकट्या महाराष्ट्रात देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ३१ टक्के गुंतवणूक झाली असून परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. एक लाख कोटी रुपयांहून अधिक एफडीआय राज्यात आला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मागास भागांमध्येही मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढली आहे. गडचिरोली, विदर्भात सर्वाधिक गुंतवणूक होत असून इलेक्ट्रिक वाहन निर्मितीत ५० हजार कोटी, वस्त्रोद्योगात हजार कोटी, कृषी क्षेत्रात अडीच हजार कोटींची गुंतवणूक झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिली. राज्याच्या विकासासाठी कर्ज उभारणी आवश्यक असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २५ टक्क्यांपर्यंत कर्ज घेण्याची मुभा असताना २०२५-२६ च्या अंदाजपत्रकानुसार केवळ १८.९७ टक्केच कर्ज उभारण्यात आले आहे. लाडकी बहीण योजना राबवूनही वित्तीय तूट ३ टक्क्यांच्या आत ठेवण्यात आली असून महसुली तूटही सीएजीच्या सर्व अटींनुसार मर्यादित आहे. असे सांगत 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना कधीही बंद होणार नाही, असा विश्वास त्यांनी दिला.

# ग्रामीण राजकारणातील रुबाबदार नेतृत्व : सागर दादा कल्याणशेट्टी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर गावाचे उपसरपंच म्हणून कार्यरत असलेले सागर दादा कल्याणशेट्टी हे आज केवळ एक नेता न राहता,चप्पळगाव जिल्हा परिषद गटातील एक प्रभावी आणि भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणून ठळकपणे पुढे येत आहेत.ग्रामीण मातीशी नाळ जुळलेला हा नेता,आपल्या कामाच्या जोरावर आणि व्यक्तिमत्त्वाच्या करिष्म्याने तालुक्यात स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे...

शेती,पशुपालन आणि ग्रामीण संस्कृतीवर जिवापाड प्रेम करणारे सागर दादा हे स्वतः रुबाबदार शेतकरी आहेत. बैलगाडी शर्यतीसारख्या पारंपरिक ग्रामीण खेळाला त्यांनी अक्कलकोट तालुक्यात प्रथमच व्यासपीठ उपलब्ध करून दिले. दरवर्षी मोठ्या दिमाखात आयोजित होणाऱ्या बैलगाडी शर्यतीमुळे केवळ ग्रामीण संस्कृतीचे जतन झाले नाही,तर युवकांमध्ये नवी ऊर्जा आणि स्पर्धात्मकता निर्माण झाली आहे...

स्वच्छ पोशाख,पिळदार मिशा,डोक्यावर पारंपरिक पांढरा टोपी आणि रस्त्यावरून जाणारी लाल थार ही केवळ स्टाईल नाही,तर एका ग्रामीण नेत्याची चालती-बोलती ओळख आहे. सागर दादा रस्त्यावरून जाताना लोकांना एका खऱ्या अर्थाने मातीतील,पण आधुनिक दृष्टिकोन असलेल्या नेत्याची झलक दिसते.मनमिळाऊ स्वभाव,सर्वांना समान न्याय देण्याची भूमिका आणि थेट संवाद ही त्यांची खरी ताकद आहे...

विद्यमान आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे ते बंधू असून,प्रत्येक निवडणुकीत पडद्यामागील कुशल सूत्रधार म्हणून त्यांनी स्वतःची क्षमता सिद्ध केली आहे.रणनीती आखणे,कार्यकर्त्यांना एकत्र बांधणे आणि मतदारांपर्यंत प्रभावी पोहोच साधणे या बाबतीत सागर दादांची भूमिका नेहमीच निर्णायक ठरली आहे. वागदरी परिसरात ते कायम सक्रिय असून,स्थानिक प्रश्नांवर ठाम आणि परिणामकारक भूमिका घेताना दिसतात...

उच्चशिक्षित कुटुंबातून आलेले सागर दादा यांच्या घरात शिक्षणाचे वातावरण आहे.जवळजवळ सर्वच कुटुंबीय शिक्षक पेशात असल्याने सामाजिक जाणीव,शिस्त आणि जबाबदारी हे संस्कार त्यांच्या कार्यपद्धतीत स्पष्टपणे जाणवतात.त्यामुळेच विकास,शिक्षण आणि संस्कृती या तिन्ही बाबींचा समतोल साधणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते...

आज अक्कलकोट तालुक्यात सागर दादा कल्याणशेट्टी यांचा मोठा फॅन फॉलोइंग आहे.ग्रामीण जनतेचा विश्वास,युवकांची साथ आणि अनुभवसंपन्न रणनीती यामुळे ते भावी जिल्हा परिषदेसाठी एक प्रबळ दावेदार मानले जात आहेत.मातीशी नाळ जुळलेले,पण आधुनिक राजकारणाची जाण असलेले हे नेतृत्व भविष्यात जिल्हा राजकारणात निर्णायक भूमिका बजावेल,यात शंका नाही...

**–सतीश कल्याणी पालापुरे (अक्कलकोट)**




# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात विद्याभवन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी पटकाविला प्रथम क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : विद्याभवन हायस्कूल, कळंब प्रशालेतील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक गटातून सहभाग घेतला होता . त्यांनी स्मार्ट एग्रीकल्चरल रोबोट या विषयावर त्यांनी उत्कृष्ट असे प्रयोगाचे सादरीकरण केले. या प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. या मिळवलेल्या यशाबद्दल प्रशालेच्या वतीने विद्यार्थ्याचा सत्कार करण्यात आला. प्रशालेचे मुख्याध्यापक कुंभार व्ही जी उपमुख्याध्यापक मयाचारी व्ही एस, पर्यवेक्षक कोळी जे एन यांच्या हस्ते अरहत वाघमारे, अनुज टिप्परसे, धीरज शेंडगे, वेदांत जोशी या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक काझी सर, विनोद सागर, श्रीमती बचाटे आर आर, डी बी पवार, सुरेश चव्हाण यांचा प्रशालेच्यावतीने सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अनिल मोहेकर, संस्थेचे सचिव डॉ अशोकराव मोहेकर यांनी या विद्यार्थ्याचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार एस जे यांनी केले.

# कोकणचे सुपुत्र मोहन कदम,श्रीराम वैद्य, दीपक फणसळकर, शांताराम गुडेकर, केतन भोज कोकण रत्न- २०२५ मानद पदवी पुरस्काराने सन्मानित







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई,(केतन भोज) : सामाजिक कार्यकर्ते जेष्ठ नागरिक पत्रकार, गुणवंत कामगार पुरस्कार विजेते श्री. श्रीराम विष्णू वैद्य,पत्रकार/सामाजिक कार्यकर्ते मोहन कदम, शांताराम गुडेकर, केतन भोज, दीपक फणसळकर यांना स्वतंत्र कोकण राज्य अभियानातर्फे पत्रकारिता /सामाजिक कार्य क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल कोकणरत्न पदवी-२०२५ पुरस्काराने गौरविण्यात आले.हा पुरस्कार प्रदान सोहळा १३ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ४ वाजता मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदान शेजारी, मुंबई येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.स्वतंत्र कोकण राज्य अभियानातर्फे मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत कोकणातील निवडक व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

स्वतंत्र कोकणराज्य अभियान तर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या कोकणरत्न या मानाच्या पदवीसाठी यंदा उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींची निवड करण्यात आली आहे. कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामाजिक प्रबोधनासाठी कार्यरत असलेल्या विविध मान्यवरांचा गौरव करणारा हा अतिशय स्तुत्यउपक्रम असून यंदाच्या सोहळ्याला विशेष उत्साहाचे वातावरण लाभले आहे. स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचा हा उपक्रम कोकणातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि जनकल्याणाच्या कार्यात योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणारा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. श्री संजय कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा दिमाखात संपन्न झाला.

या पुरस्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार सचिन कळझुनकर व्यासपीठावर उपस्थित होते.

मुंबई अध्यक्ष श्री धनंजय कुवेसकर, खजिनदार श्री राजेंद्र सुर्वे, नेते श्री सुभाष राणे आणि सल्लागार श्री दिलीप लाड या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.गेली अनेक वर्षे पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रश्न धडाडीने मांडणारे रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील देवरुख शहर पासून जवळच असलेल्या श्री क्षेत्र मार्लेश्वर परिसर मधील आंगवली (रेवळे वाडी) चे सुपुत्र श्री. शांताराम ल. गुडेकर तसेच मु. पो. कासार कोळवण गावातील समाज सेवक, पत्रकार, अष्टपैलू व्यक्तीमत्व श्री. मोहन जयराम कदम, लांजा तालुका सुपुत्र केतन भोज,दीपक फणसळकर आणि रायगड चे सुपुत्र श्रीराम वैद्य यांना प्रतिष्ठेच्या 'कोंकणरत्न पदवी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकार श्रीराम वैद्य, मोहन कदम, शांताराम गुडेकर, केतन भोज, दीपक फणसळकर यांना अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले असून त्यांची पुरस्कारांची मालिका अखंडपणे सुरूच आहे.त्यांच्या या चतुरस्र कामगिरीबद्दल स्वतंत्र कोकण राज्य अभियानातर्फे कोंकणरत्न पदवी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यांनी ग्रामीण भागातील अनेक मूलभूत प्रश्न, स्थानिक स्तरावरील प्रशासकीय कामकाजातील त्रुटी अत्यंत परखडपणे आणि निःपक्षपातीपणे समाजासमोर आणल्या. त्यांचे तळागाळातील सामान्य नागरिकांच्या समस्यांना प्रभावीपणे वाचा फोडल्याने प्रशासनाला अनेक वेळा या प्रश्नांची गंभीर दखल घेण्यास भाग पाडले आहे. सामाजिक संघटनांच्या माध्यमातून ते अनेक सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयी उपक्रम राबवित असतात. रत्नागिरी, रायगड जिल्ह्यासह त्यांचे कार्य हीच त्यांची एक ओळख निर्माण झाली.कोणतीही अपेक्षा न करता निस्वार्थी वृत्तीने समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ते सतत झटत असतात.श्रीराम वैद्य हे गेली ४५ वर्ष सामाजिक कार्यात कार्यरत आहेत.

अनेक संघटनांवर पदाधिकारी,सदस्य म्हणून काम पाहत आहेत.त्यांना आजवर विशेष कार्यकारी अधिकारी,गणुवंत कामगार पुरस्कार, आदर्श मित्र पुरस्कार, राष्ट्रीय सामाजिक एकता गौरव पुरस्कार, मुंबई रत्न पुरस्कार, समाज गौरव पुरस्कार, कोकण दिप सामाजिक सेवा पुरस्कार, कामगार भूषण पुरस्कार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रयत सेवक पुरस्कार, आदर्श मुंबईकर महापौर सन्मान पत्र, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे गौरव पत्र, नशाबंदी मंडळ नागरिक समिती गौरवपत्र, रक्तदान शिबिर प्रशस्तीपत्र, कामगार सभा आकाशवाणी मुलाखत, नागरी संरक्षण दल, बृहनमुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय फेलोशिप, स्वकुळ वैभव पुरस्कार व संकल्प कृतार्थ जीवन गौरव पुरस्कार आदी पुरस्कार मिळालेले आहेत.

श्री. मोहन जयराम कदम हे एक अष्टपैलू-व्यासंगी सामाजिक कार्यकर्ता आणि निस्पृह- सजग पत्रकार असे व्यक्तिमत्व आहे. त्यांना आजवर राष्ट्रीय एकता सन्मान महासोहळा,राष्ट्रीय ग्राउंड लीडरशीप आयकॉन पुरस्कार, कोकणदीप समाजरत्न पुरस्कार २०२५, एशियन टॅलेन्ट गोल्डन अवॉर्ड सोहळा. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज गौरव पुरस्कार, प्रेरणा फाउन्डेशन तर्फे महाराष्ट्र उत्कृष्ट समाजसेवक राज्यस्तरीय पुरस्कार २०२५, प्रेरणा फाउन्डेशन तर्फे राज्यस्तरीय माणुसकी रत्न पुरस्कार २०२५, इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन व अमरदीप फाउंडेशन तर्फे राज्यस्तरीय जनरत्न प्रतिक्षा भूषण पुरस्कार २०२४, धगधगती मुंबई पुरस्कार २०२३,कला साधना सोशल संस्था पुरुष उत्कृष्टता पुरस्कार २०२३, लोकगौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद राष्ट्रीय लोक कल्याणकारी सेवा रत्न पुरस्कार २०२३, कार्यदर्पण आणि इव्हेंट टी एम जी सहयोगी संस्थेतर्फे जनगौरव कार्य दर्पण आयकॉन पुरस्कार २०२२,आंतरराष्ट्रीय मानव हक्क सेवा परिषद व महाराष्ट्र न्यूज १८ 'भारत श्री' नॅशनल पुरस्कार २०२२ आदी पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत.सामाजिक कार्यातील सर्वोच्च पुरस्कार कोकणरत्न म्हणून दीपक फणसळकर यांचा गौरव करण्यात आला. समाज तुमच्या कार्याची दखल तेव्हाच घेते जेव्हा तुमच्या सामाजिक कार्याचे दाखले नव्या तरुण पिढीसाठी दिले जातात.दीपक फणसळकर या कामासाठी अग्रेसर आहेत.

सामाजिक कार्यात कायम आपले योगदान देऊन समाजाला नव्या दिशेने घेऊन जाणारे ,छोट्या छोट्या कार्यांनी मोठे बदल घडून येतात तुमचं या कार्यात सातात्यते टिकणे फार महत्वाचे असते .श्री फणसळकर यांची समाजाप्रती असलेली कार्यतत्पर सेवा आणि सातत्य आणि म्हणूनच स्वतंत्र कोकणराज्य अभियाना तर्फे त्यांची कोकणरत्नया सर्वोच्च पदवीसाठी निवड करण्यात आली.

हा पुरस्कार त्यांना मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदाना जवळ, मुंबई येथे स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचे संस्थापक अध्यक्ष श्री संजय कोकरे आणि वरिष्ठ पत्रकार आणि संपादक श्री सचिन कळझुनकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. फणसळकर यांना आजवर अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. पुढील सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेकांनी शुभेछया दिल्या आहेत.समाजात बरेच लोक सामाजिक कार्यात योगदान देत असतात हा पुरस्कार त्या सर्व समाज बांधवांचा आहे जे आपले घर संसार सांभाळून समाज कार्य करतात असा मोलाचा संदेश कार्यक्रम दरम्यान श्री दीपक फणसळकर यांनी दिला.शांत्ताराम गुडेकर यांना महाराष्ट्र शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून २०१२ ते २०१७ या काळावधीसाठी नियुक्त केले होते.त्यांना डाॅ.बाबासाहेब आंबेडकर फॅलोशिप पुरस्कार -दिल्ली प्राप्त झालेला आहे. ते महाराष्ट्र शासनाच्या नागरी संरक्षण दल-एन विभाग-क्षेत्र-३ मध्ये स्वयंसेवक म्हणून कार्यरत होते.

शिवाय महाराष्ट्र शासन अनुदानित नशाबंदी मंडळ- महाराष्ट्र राज्य या मंडळतर्फे नशाबंदी चे काम करतात. कोकण विभाग पत्रकार संघ मुंबई जिल्हा सचिव म्हणून ते काम पाहिले असून त्यांना नगर मित्र,आदर्श समाजसेवक , समाजरत्न , दक्ष नागरिक , कोकण भूषण ,वृत्तदिप पुरस्कार महापौर गौरवपत्र तसेच सोनी टि.व्ही वरील सी.आय.डी मालीकेला वर्धापनदिनानिमि आयोजित कार्यक्रमात शांत्ताराम गुडेकर यांना स्थानिक हिरो सी.आय.डी मेडल व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आलेले आहे.

श्री शांताराम गुडेकर महाराष्ट्र हरित सेना, वन विभाग, महाराष्ट्र शासन चे सदस्य, माझी वसुंधरा, महाराष्ट्र शासन चे सदस्य आहेत. शिवाय माहिती अधिकार, पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण सेना चे मुंबई जिल्हा प्रसिद्धी प्रमुख आहेत.अखिल भारतीय पत्रकार हक्क संसद समिती चे मुंबई उपनगर सचिव आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यामधील कोचरी गावातील सुपुत्र कु. केतन भोज यांचा हा सातवा पुरस्कार असून ते आरटीआय कार्यकर्ता आहेत. शिवाय कोकणच्या समस्यांवर लेखन करून त्यांचा पाठपुरावा सातत्याने ते करत आहेत.महाराष्ट्र हरित सेना,वन विभाग महाराष्ट्र शासनचे ते सदस्य आहेत. कोकणातील अनेक समस्या वर्तमान पत्रात मांडून त्यांना मार्गी लावण्यात केतन भोज अग्रेसर आहेत. त्यांना मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या सहीचे सोशल मिडिया महामित्र हे सन्मानपत्रही प्राप्त झालेले आहे. शिवाय ते विविध संस्था,पत्रकार संघटना, वृत्तपत्र लेखक संघ,मंडळ यांचे पदाधिकारी असून हातात घेतलेलं प्रत्येक काम पूर्ण करण्यात ते यशस्वी झालेले आहेत.आजवर त्यांना २७ विविध पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत.

कोकणचे सुपुत्र श्रीराम वैद्य, मोहन कदम, दीपक फणसळकर, केतन भोज, शांताराम गुडेकर कोकण रत्न- २०२५ मानद पदवी पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यामुळे त्यांचे पत्रकार मित्र, विविध पत्रकार संघ, सामाजिक संघटना, शेतकरी संघटना, राजकीय पक्ष नेते, असंख्य वाचक, चाहते, हितचिंतक यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# वैद्यकीय सेवा मिळत नसल्याने नागणसूर प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णसेवा योजनांचा पुरता उडाला बोजवारा

## नियुक्त महिला कर्मचाऱ्याचे आठवड्यातून मोजक्या दिवसाचेच दर्शन; ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट / प्रतिनिधी

ग्रामीण भागातील गोरगरिबांना मोफत आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी महाराष्ट्र शासनाने तालुका स्तरावर प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू करून वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली आहे. परंतु या ठिकाणी नेमलेल्या महिला कर्मचाऱ्याकडून सेवा मिळत नसल्याने शासनाच्या रुग्णसेवा योजनांचा पुरता बोजवारा उडाल्याचे चित्र प्राथमिक आरोग्य केंद्र नागणसूर येथे पहायला मिळते.

प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेविका वंदना कुलेवार व आरोग्य सहाय्यक रिबेका कानेपागुल या महिला अधिकाऱ्याला या ठिकाणी नियुक्ती देण्यात आली आहे. मात्र त्या महिला कर्मचाऱ्याचे आठवड्यातून मोजके दिवसाचे दर्शनच होत असते.

पगार मात्र पूर्ण निघत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. आठवड्यातून एक दोन दिवस येतात आणि बाकीचे दिवस गैरहजर राहतात.त्यामुळे कर्मचारी अभावी आरोग्यसेवेचा पूर्णत: खेळखंडोबा व बोजवारा उडत आहे.आरोग्य व्यवस्था खिळखिळी होत असताना आरोग्यमंत्री व जिल्ह्याचे लाडके पालकमंत्री गोट्या खेळतात का?असा सवाल उपस्थित होत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.मुस्तफा सलगरे हे सर्वसामान्यांना आरोग्य सुविधा कशा पुरविता येतील यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत.मात्र प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात काही महिला कर्मचाऱ्यांकडून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक करीत 'हम करो सो कायदा'असा काहीसा प्रकार चालविला आहे. उपकेंद्रातील जबाबदारी व कर्तव्य बाजुला सारत महिन्याचे पूर्ण पगार घेऊन स्वत:ला धन्यता मानली जात आहे.त्यामुळे आरोग्य व्यवस्था खिळखिळी होत आहे.महिला कर्मचाऱ्याची तक्रार वरिष्ठांना केल्यास तक्रार करणाऱ्यास त्याच्या दालनात जाऊन धमकी देतात.तक्रार करुनही उपयोग काय?कारवाई दडपतात!अन्यायाविरुद्ध आवाज उचलणाऱ्यांनाच संघर्ष करावा लागत असल्याने तक्रार करावी तरी कुणाकडे असा प्रश्न उपस्थित होत आहे. वैद्यकीय अधिकारी यांच्या पदाचा भार सांभाळताना अडचणी येत असल्याने वरिष्ठांना सूचना केल्या.मात्र सातत्याने दुर्लक्ष केले.

> **उपचारासाठी येणाऱ्या गोरगरीब व वयोवृद्ध रुग्णांची हेळसांड होऊ नये याची काळजी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी घ्यावी.**
>
> **– सुनिता चव्हाण** (सरपंच नागणसूर)

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका व आरोग्य सहाय्यक महिला कर्मचाऱ्यांनी रुग्णास सेवा देण्याऐवजी सतत गैरहजर राहतात.ह्या कर्मचाऱ्यांची हजेरी मस्टरवर गैरहजर दाखवून वैद्यकीय अधिकारी डॉ.मुस्तफा सलगरे यांने वरिष्ठाकडे लेखी तक्रार दिली .गैरहजर दाखवल्याने महिला कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना ट्रॉसिटीची धमकी देत आहे.त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.याप्रकरणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या महिला कर्मचाऱ्यांची कसून चौकशी करण्यात यावी अशी मागणी नागरिकाकडून होत आहे.

नागणसूर व परिसरातील शेकडो रुग्ण या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात उपचारासाठी येत असतात.मात्र गेल्या वर्षभरापासून महिला कर्मचारी कधी रजेवर जातात तर कधी गैरहजर असतात. या कर्मचाऱ्याकडून रुग्णाची सेवा होत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.गैरहजर राहून पूर्ण महिन्याचे पगार घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचे हजेरी मास्टरवर गैरहजर दाखवणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना ट्रॉसिटीची धमकी दिली जाते हे कितपत योग्य आहे. याबाबत तालुक्याचे आमदार यांना कळविले,

> **ईसीजी,प्रस्तुतीगृह,ऑपरेशन थेटरची व्यवस्था आहे. तसेच आठवड्यातून एक दिवस नेत्र तपासणी केली जाते,ब्लड तपासणी होत असते.बंद पडलेली मशनरी चालू केले, काही मशनरी चालू करण्यात येणार आहे. तसेच १०२ चे म्बुलन्स २४ तास जनतेच्या सेवेत उपलब्ध आहेत.या ठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून चांगली सुविधा मिळत आहे.**
>
> **धनराज धानशेट्टी** (सदस्य प्राथमिक आरोग्य केंद्र, माजी उपसरपंच नागणसूर)

कामचुकार महिला कर्मचाऱ्यांची तक्रार थेट वरिष्ठाकडे केली.तरी देखील ह्या महिला कर्मचाऱ्याला काही फरक पडले नाही.मग हे कर्मचारी ऐकून घेतात तरी कुणाचे,अक्कलकोटच्या आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केलेल्या तक्रारीची दखल वरिष्ठ अधिकारी घेत नसेल, तर ह्या महिला कर्मचाऱ्यांचा बॉस कोण ?असेल,याची चर्चा मात्र सर्वत्र होत आहे.

आरोग्य सेविका यांना कमी जास्त लाख पगार पूर्ण घेऊन सुद्धा कामचुकारपणा करतात.या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात दैनंदीन शेकडो रुग्ण हे वैद्यकीय तपासणीसाठी आणि विविध आजारांवरील उपचारांसाठी येत असतात. तसेच महिला प्रसूतीसाठी येतात.याशिवाय सर्प आणि विंचूदंशाचे रुग्ण व महामार्गावरील अपघात झालेल्या रुग्णांची संख्यादेखील असते. मात्र येथील महिला कर्मचाऱ्या अभावी रुग्णांची कुचंबणा होत आहे.काम चुकार करणाऱ्या महिलांची सखोल चौकशी करून त्यांना सेवेतून कार्यमुक्त करण्यात यावे असे या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# नागपूर : 'दैनिक समर्थ गावकरी' दिवाळी अंकाचे भव्य प्रकाशन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर/प्रतिनिधी : नागपूर येथे 'दैनिक समर्थ गावकरी' दिवाळी अंकाचा भव्य प्रकाशन सोहळा राज्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. सामाजिक भान, ग्रामीण विकास आणि प्रबोधनात्मक लेखनासाठी ओळख असलेल्या या दिवाळी अंकाच्या प्रकाशनाने नागपूरच्या साहित्यिक व पत्रकारितेच्या वातावरणात नवचैतन्य निर्माण केले.

प्रकाशन सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे, उद्योग मंत्री ना. उदय सामंत, औषध निर्माण मंत्री ना. नरहरी झिरवाळ, आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे तसेच सुषमा अंधारे हे मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याचे माहिती महासंचालक ब्रिजेश सिंग मिश्रा यांनीही विशेष उपस्थिती लावली.

कार्यक्रमाला पत्रकार संघटनांच्या उच्च पदाधिकाऱ्यांचीही उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस सिद्धार्थ भोकरे, दैनिक समर्थ गावकरीचे संपादक व राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, विदर्भ प्रमुख अनुप भार्गव, प्रदीप शेंडे, तसेच दैनिकाचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर हे सर्व मान्यवर या सोहळ्यात सहभागी झाले.

दिवाळी अंकामध्ये ग्रामीण विकास, शेती, सामाजिक परिवर्तन, जलव्यवस्थापन, उद्योगक्षेत्र, सांस्कृतिक वारसा आणि समकालीन विषयांवर लेखनाचा समृद्ध असा संग्रह वाचकांसमोर आणण्यात आला आहे.

प्रकाशनानंतर झालेल्या चर्चासत्रात मंत्री, पत्रकार आणि संपादकांनी ग्रामीण पत्रकारितेचे वाढते महत्त्व, शासन-माध्यम समन्वय आणि मूल्याधिष्ठित पत्रकारितेची गरज यावर आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन आणि संयोजनामुळे 'दैनिक समर्थ गावकरी' दिवाळी अंकाचा सोहळा यंदा विशेष गाजला.

# कळंब येथे हमाल मापाडी सामाजिक संघटनांच्या वतीने बाबा आढाव यांना श्रद्धांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे : रोजी ,रोटी साठी घाम गाळणाऱ्या श्रमिक लोकांना संघटन करून त्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली हमाल ,मापाडी, ऑटो रिक्षा चालक, बांधकामजूर तसेच काच, कागद गोळा करणाऱ्या लोकांसाठी आयुष्यभर कार्य केले, डॉक्टर असूनही त्यांनी सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी समाजसेवेचा मार्ग निवडला व मार्गक्रमण केले, महात्मा फुले यांनी दाखवलेला सार्वजनिक सत्य धर्माचा मार्ग अवलंबिला , अशा या महान श्रमकरी कष्टकरी लोकनेत्याला कळंब येथील





हमाल मापाडी संघटनेच्या वतीने दिं.९ डिसेंबर रोजी काम बंद ठेवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली दिवसभर आडत बाजार बाजार पेठ बंद होती.

याप्रसंगी हमाल मापाडी संघटनेचे अध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समिती हमाल मापाडी संचालक धनंजय अडसूळ तसेच संघटनेचे शिवाजी अडसूळ, राजपाल शिंदे, सुनील देडे, विलास कदम, भगवान वैरागे, रतन कांबळे, यांच्यासह हमाल मापाडी यांनी श्रद्धांजली अर्पण केली तर भारत जोडो अभियान च्यावतीने विधीज्ञ त्र्यंबकराव मनगिरे, विलास करंजकर, सुभाष घोडके, यशवंत हौसलमल, सुरेश टेकाळे, माधवसिंग राजपूत, बाबू पौळ, शरद खंदारे, डॉ. अशोक माळी, मोहन पौळ यांनी श्रद्धांजली अर्पण केली. व डॉक्टर बाबा आढाव यांनी कळंब येथे आले असताना त्यांनी हमाल मापाडीच्या मेळाव्यात व्यक्त केलेले विचार व आठवणीनां उजाळा दिला व त्यांनी केलेल्या कार्यातून त्याग, वैचारिक निष्ठा, मानव कल्याणाचे विचार, अधिक बळकट होतील असे विचार व्यक्त केले.

# राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेसाठी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या शुभम चिखले यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची खेळाडू शुभम राजेंद्र चिखले यांनी १९ वर्ष वयोगट मुलांमध्ये विभागातून प्रथम क्रमांकाने विजय प्राप्त केला आहे त्यामुळे शुभमची अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

शुभम नी दिनांक ०९/१२/२०२५ रोजी पुणे येथे झालेल्या शालेय विभागीय स्तरीय आर्चरी स्पर्धेत पहिल्या फेरीत ७० मीटरचे दोन अंतरात ३३१ दुसऱ्या फेरी ३२७ असे एकूण ६५८ गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला आहे. या कामगिरीमुळे त्यांची १७ व २० डिसेंबर रोजी अमरावती येथील जिल्हा क्रीडा संकुलात होणाऱ्या राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यासाठी शुभमला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्राध्यापक राजकुमार काळे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

शुभमच्या या यशाबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, स्वसचिव विक्रम सिंह सूर्यवंशी, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एल बी पाटील, उपप्राचार्य अनिल साळुंखे कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्रमजीवी संघटनेचा राजीनामा देत प्रमोद पवारांचा नवा लढा

# भिवंडी-वाडा रस्त्याच्या दुरवस्थेविरोधातील आंदोलनातून 'भूमिपुत्र एल्गार संघटना'ची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी-वाडा रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात केलेल्या आंदोलनानंतर श्रमजीवी संघटनेचे प्रवक्ते तथा कार्यकर्ते प्रमोद पवार यांनी श्रमजीवी संघटनेचा राजीनामा देत स्थानिक भूमिपुत्रांच्या न्याय हक्कांसाठी 'भूमिपुत्र एल्गार संघटना'ची स्थापना केली आहे. ही घोषणा शनिवारी अंबाडी येथे आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. या वेळी बोलताना संघटनेचे अध्यक्ष प्रमोद पवार यांनी स्पष्ट केले की, या संघटनेला कोणत्याही मोठ्या नेत्यांचा पाठिंबा किंवा राजकीय आशीर्वाद नाही. संघटनेतील प्रत्येक कार्यकर्ता हाच नेता आहे. भिवंडी-वाडा रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अनेक तरुणांचे अपघाती मृत्यू झाले असून, ३० सप्टेंबर रोजी केलेले आंदोलन यशस्वी ठरले, मात्र श्रमजीवी संघटनेचे अपेक्षित सहकार्य मिळाले नाही. त्यामुळे ४ नोव्हेंबर रोजी श्रमजीवी संघटनेचा राजीनामा देऊन नवा पर्याय उभा केला असल्याचे त्यांनी सांगितले.

ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी, कष्टकरी, बेरोजगार व



तरुणांना न्याय मिळवून देण्यासाठी 'भूमिपुत्र एल्गार संघटना' काम करणार असल्याचे सांगताना पवार म्हणाले, आमचा लढा कोणाविरुद्ध नाही, मात्र अन्याय आणि भ्रष्टाचाराविरुद्ध नक्की आहे. आम्हाला सत्तेची हाव नाही, तर जनतेचा आवाज व्हायचे आहे.

ही संघटना ठाणे-पालघर जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांत संघटित स्वरूपात उभी राहणार असून, पारदर्शकता, डिजिटल कार्यप्रणाली आणि तळागाळातील जनसंवाद हा या चळवळीचा पाया असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. कातकरी, आदिवासी, कुणबी, आगरी, बौद्ध तसेच सर्व जाती-धर्मांतील अन्यायग्रस्त शेतकरी व श्रमिकांसाठी ठोस लढा उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संघटनेच्या ध्वजाचे अनावरण करण्यात आले. कार्याध्यक्ष सुनील लोणे यांनी ध्वजाचे महत्त्व विषद केले. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांत कार्याध्यक्ष सुनील लोणे, सरचिटणीस नवनाथ भोये, उपाध्यक्ष कल्पेश जाधव आणि ड. सोनाली पवार यांचा समावेश आहे. तर कार्यकारिणी सदस्य म्हणून रुपेश जाधव, स्वप्नील वाघ, मिलिंद कांबळे, मुकेश पाटील, दुष्यंत घायवट, प्रमिला तरसे, चित्रा वाघ, आदेश रायात, सुशीला आत्राम, सुशांत चौधरी, सागर न्हानवे, भारत जाधव, विजय राऊत, महेश ठाकरे, शरद जाधव, नईम शेख, दयानंद मते, प्रमोद देसले, संकेत लोणे, वेद राऊत, ऋषी पाटील, तेजस पाटील, राकेश जाधव, तुषार जाधव, साहिल लोणे आदी उपस्थित होते.

# सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मंगळवार १६ डिसेंबरपासून इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्विकारणार : संतोष पवार !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर - ( प्रतिनिधी ) - आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने मंगळवार १६ डिसेंबरपासून इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्विकारण्यात येणार असल्याची माहिती अजितदादा पवार राष्ट्रवादीचे शहर-जिल्हाध्यक्ष संतोष पवार आणि कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी दिली.

राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, सोलापूरचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे, सहसंपर्कमंत्री आण्णा बनसोडे यांच्या आदेशान्वये आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीची तयारी जोमाने सुरु आहे. सहसंपर्कमंत्री आण्णा बनसोडे यांचा नुकताच तीन दिवसांचा सोलापूर दौरा झाला आहे. तसेच नागपूर येथे सोलापूर शहरातील पाणी प्रश्न आणि विविध समस्यांवर बैठक आयोजित करून त्यासंदर्भात मध्यरात्री १२ ते पहाटे ४ वाजेपर्यंत पिण्याचे पाणी पुरवठा बंद करण्याच्या सुचना देऊन त्यावर अंमलबजावणी करण्यात आली. सोलापूर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सर्व १०२ जागेवर उमेदवार उभे करणार आहे.

अब की बार ७५ पारचा नारा सहसंपर्कमंत्री अण्णासाहेब बनसोडे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दिला होता. अण्णा बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच अनेक मान्यवरांनी पक्षात प्रवेश केला आहे. आणखी दिग्गज नेते पक्षात प्रवेश करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी सोलापुरात पोषक वातावरण तयार झाले असून इच्छूक उमेदवारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे.

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल केव्हाही वाजण्याची शक्यता असून त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने सोलापूर महानगरपालिका निवडणूक लढवण्यासाठी इच्छूक असणाऱ्या उमेदवारांचे अर्ज मंगळवार १६ डिसेंबरपासून गुरुवार १८ डिसेंबरपर्यंत सलग तीन दिवस दररोज सकाळी ११ ते २ या वेळेत जुनी मिल कंपाउंड येथील राष्ट्रवादी भवन कार्यालय येथे स्विकारणार येणार आहेत.

यावेळी राष्ट्रवादीचे सर्व जेष्ठ नेते प्रदेश पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत .

महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादीसाठी सकारात्मक वातावरण दिसून येत असून राष्ट्रीयचे अध्यक्ष अजित पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह संपर्कमंत्री अण्णासाहेब बनसोडे यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत,असेही जिल्हाध्यक्ष संतोष पवार आणि कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी सांगितले.

इच्छूक उमेदवारांचे अर्ज स्विकारल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशाने इच्छुक उमेदवारांसाठी मुलाखतीची तारीख ,वेळ आणि ठिकाण ठरविण्यात येईल,असेही जिल्हाध्यक्ष पवार आणि कार्याध्यक्ष बागवान यांनी सांगितले.

# पंढरपुरात प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखु विक्री करणाऱ्यावर पोलीस प्रशासनाची कारवाई

## प्रतिबंधित गुटखा व तंबाखुजन्यचा ६६ हजार ६२४ रू किमतीचा मुद्देमाल जप्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुर येथील यशवंत जुमाळे उर्फ गवळी यांनी त्याच्या राहत्या घरामध्ये स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीता विक्रीसाठी प्रतिबंधित पानमसाला, गुटखा व सुगंधित तंबाखूचा साठा करून विक्री करीत असल्याची माहिती दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी पंढरपुर शहरचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांना मिळाली. माहितीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी पंढरपूर शहर पोलिसांनी कारवाई करून प्रतिबंधित गुटखा व तंबाखुजन्यचा ६६ हजार ६२४ रू किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी दिली

पंढरपूर येथील यशवंत दत्तात्रय जुमाळे उर्फ गवळी, वय ३४ रा.घर नं २५७४, महाव्दार रोड, पंढरपुर यांच्या राहत्या घराच्या पहिल्या मजल्यावर प्रतिबंधीत असलेला पानमसाला व एम सुगंधित तंबाखु असा प्रतिबंधीत मुद्देमाल मिळून आल्याने तो जप्त करून पंढरपूर शहर पोलीस आणण्यात आला आहे. याबाबत अन्न व औषध प्रशासन अधिकारी, चन्नवीर राजशेखर स्वामी, यांचेशी संपर्क करून कायदेशीर फिर्याद देण्यात आलेली आहे.

या कारवाईत रजनीगंधा पानमसाला (चार बॉक्स) किंमत ३,८४०/- रुपये ,एम सुगंधित तंबाखु (चार बॉक्स) २४००/- रुपये,बाबा नवरत्न पानमसाला(१५ टिन) ३७,५००/- रुपये,विमल पानमसाला (२४ पाकिटे),२८८०/- रुपये, व्हि-१ सुगंधित तंबाखु (४६पाकिटे)११८८/-रुपये, विमल पानमसाला(२२ पाकिटे) ४३५६/- रुपये,बी सुगंधित तंबाखु (सात किलो) ७०००/- रुपये,रत्ना सेंटेड तंबाखु (चार बॉक्स) ७६०/- रुपये,आरएमडी पानमसाला (तीन बॉक्स) २७००/- रुपये,सुगंधित तंबाखु पावडर (तीन डब्बे) ३०००/- रुपये असा एकूण ६६ हजार ६२४ रुपये किमतीचा प्रतिबंधीत तंबाखु, पानमसाला जप्त करण्यात आला आहे

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर, सहा. पोलीस अधिक्षक पंढरपूर विभाग, श्री. प्रशांत डगळे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपुर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो नि आशिष कांबळे, सपो.फौ. कल्याण ढवणे, पोलीस नाईक सचिन इंगळे, पो. हवा विठठल विभुते, पोकॉ शहाजी मंडले, कपिल माने, दिपक नवले यांनी केली आहे.

# स्प्रिंट फोर आपत्कालीन प्रकल्पातून होतेय रुग्णसेवा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा स्प्रिंग फोर सी.इ. महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रतिसाद प्रकल्प अंतर्गत व सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभाग, सोलापूर जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, इंडियन रेड क्रॉस सोसायटी व भारतीय जैन संघटना यांच्या सहकार्याने सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त गावांमध्ये प्रजनन आरोग्य व कुटुंब कल्याणाच्या आरोग्य सेवा देण्याचे कार्य सुरू करण्यात आले आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून दक्षिण सोलापूर तालुक्यातील संजवाड या गावात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

संजवाड या पूरग्रस्त गावातील गरोदर व स्तनदा माता, महिला, पुरुष व युवा मुले, मुली, किशोरवयीन मुला मुलींना, वयोवृद्ध, विधवा, अपंग, अंध, मतिमंद, शारीरिक वाढ खुंटलेली मुले यांना प्रजनन आरोग्याच्या सेवा ८६ लोकांना देण्यात आल्या. यात प्रामुख्याने कुटुंब नियोजनाची निरोध व ओरल पिल्स देणे, कॉपर टी बसवणे, गर्भनिरोधक इंजेक्शन, आपत्कालीन गर्भनिरोधक गोळ्या वाटप आदी सेवा, युरीन प्रेग्नेंसी टेस्ट, गरोदर व स्तनदा तपासणी, स्त्रीरोग तपासणी उपचार, स्तनाचा व गर्भाशयाच्या कॅन्सरची तपासणी, लिंगभेद आधारित हिंसाचार समुपदेशन, मूत्रमार्गा विकार तपासणी व उपचार, गुप्तरोग तपासणी व एच. आय. व्ही. तपासणी व उपचार, जनरल तपासणी व उपचार, जिल्हा आरोग्य विभागाच्या सहकार्याने लहान बाळांचे लसीकरण आधी आरोग्य सेवा दिल्या जात आहेत अशी माहिती एफ. पी. ए. आय.सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी दिली.

स्प्रिंट महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रतिसाद प्रकल्प अंतर्गत प्रकल्प समन्वयक स्वप्निल सोनवणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरी कहाते, समुपदेशीका रेखा पाटील-कपाळे, परिचारिका शकीला मणियार, लॅब टेक्निशियन व्यंकटेश कंची, सांख्यिकी अधिकारी मल्लिकार्जुन कडकोळ, स्वयंसेवक म्हणून अविनाश कांबळे, सुनीता पाटील, जिया शेख, कीर्ती ढंगापुरे आदी कर्मचारी सेवा देत आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त गावांमध्ये आरोग्य तपासणी शिबिरांच्या आयोजनात व नियोजनात मुंबई मुख्यालयाचे डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, असिस्टंट डायरेक्टर जनरल प्रोग्राम अमिता धानू व प्रकल्प प्रमुख डॉ. अमित किटूकले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, डॉ. किशोर घाडगे, डॉ. मोहन शेगर, डॉ. अविनाश खांडेकर, अक्कलकोट तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, विस्तार अधिकारी महेश भोरे, सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, साहाय्यक अधिकारी अर्चना बिसोई आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.

# अनधिकृत उत्खननावर पुरंदर तहसील कार्यालयाकडून कारवाई



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : :पुरंदर तालुक्यातील अनधिकृत गौणखनिज उत्खननावर शासनाच्या नव्या नियमानुसार कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. वाळू उत्खनन मार्गावर विशेष महसूल पथके पोलीस बंदोबस्तासह नियुक्त करण्यात आली आहेत, अशी माहिती तहसीलदार विक्रम राजपूत यांनी दिली. चोरी छुपे उत्खननाचे पेव फुटल्याने शासनाने वाळू व इतर गौणखनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर, वाहतूक यावर प्रतिबंध आणण्यासाठी कडक निर्बंध लागू केले आहेत, असेही पुरंदरचे तहसीलदार श्री विक्रम राजपूत यांनी सांगितले.

शासननिर्णयानुसार वाळू व इतर गौणखनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर वाहतूक व तस्करीमध्ये आढळून आलेल्या व्यक्तीवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार केवळ दंडात्मक कारवाई न करता संबंधितांविरुद्ध 'मोक्का' कायद्याअंतर्गत कारवाई महसूल विभागामार्फत करण्यात येणार आहे. या आदेशानुसार बोपगावचे ग्राम महसूल अधिकारी श्री कटारे व भिवरीचे ग्राम महसूल अधिकारी श्री भागवत यांनी ८ डिसेंबर रोजी अनधिकृतपणे गौणखनिज उत्खनन वाहतूक करत असल्याचे आढ़ळून आलेल्या जे.सी.बी. वाहन (एमएच १६ बीझेड ६८३४) याचे मालक आणि चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुळुंचे गावचे ग्राम महसूल अधिकारी लोंढे गावाच्या हद्दीत अनधिकृतपणे गौणखनिज वाहतूक करणाऱ्या डंपरवर कारवाई करत असताना गौणखनिज माफियांकडून शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी नितीन वसंतराव निगडे व आणखी एका अनोळखी यांच्यावर गुन्हा नोंद केला आहे.

अनधिकृत गौणखनिज वाहतूक करणारे वाहन (एम.एच. ११ डीडी ७०५६) हे वाहन जेजुरी पोलिसांनी जप्त केले आहे, त्यावर नियमानुसार कारवाई चालू आहे. गौणखनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करीमध्ये आढळून आलेल्या व्यक्ती यांच्यावर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार केवळ दंडात्मक कारवाई न करता संबंधितांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार विक्रम राजपुत यांनी दिला आहे.

# कळंब येथे ज्येष्ठ नागरिक महासंघाचा वर्धापनदिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस कॉम गेली ४५ वर्ष महाराष्ट्र राज्य तसेच देशपातळीवर संघटनात्मक कार्यातून ज्येष्ठांचे विविध प्रश्न अडचणी तसेच ज्येष्ठासाठी शासनाच्या योजना व सामाजिक सहभाग वाढवण्यासाठी व त्यांना उत्साही व आनंदी जीवन जगतायावे यासाठी कार्य करीत आहे दि.१२ नोव्हेंबर रोजी ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस कॉम या संघटनेचा ४५वा वर्धापन दिन कळंब येथे ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्र डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर बालोद्यान येथे उत्साहात साजरा करण्यात आला, याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ त्र्यंबकराव मनगिरे ज्येष्ठ नागरिक यशवंत हौसलमल, विलास करंजकर, सुरेश टेकाळे यांनी ज्येष्ठांचा मानसन्मान व्हावा प्रत्येक कार्यालयात त्यांचे काम प्राधान्याने व्हावे तसेच जेष्ठासाठी असलेले कायद्याचा उपयोग ज्येष्ठ नागरिकांना झाला पाहिजे यासाठी कार्य करण्याची गरज प्रतिपादन केली व फेसकॉम करीत असलेल्या संघटनात्मक कार्याबद्दल आनंद व्यक्त केला कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधवसिंग राजपूत यांनी केले

याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक प्रा. घुले, अच्युत उर्फ बाबुराव पौळ, शरद खंदारे, डॉ, अशोक माळी, मोहन पौळ, संतोष भोजने, बशीर पठाण, गुलाब बागवान, डुकरे यांच्यासह ज्येष्ठ नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील यांची सदीच्छा भेट व सत्कार!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे नेते मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील यांची नुकतीच निवड झाल्यानंतर आज महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांची सदीच्छा भेट घेऊन अभिनंदन केले.

या भेटीदरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने दीपावली विशेषांकाचे प्रकाशन मा. आ. घुले पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी शाल, पुष्पगुच्छ, खारीक-खोबरे हार आणि साईबाबा मूर्ती देऊन डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांचा सत्कार केला.

या कार्यक्रमास जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक रावसाहेब वरपे, नामवंत उद्योजक राहुल पाबळकर तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर उपस्थित होते.

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर जिल्ह्यात सहकार क्षेत्रातील कामकाज अधिक गतीने व पारदर्शकपणे राबविण्याचा विश्वास मा. आ. घुले पाटील यांनी व्यक्त केला. उपस्थित मान्यवरांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## सीआयआय एफपीओ समिट २०२५ मध्ये स्वयम् सखी शेतमाल उत्पादक कंपनीला राष्ट्रीय मान्यता

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी अमर जाधव/ नवी दिल्ली : महिलांच्या नेतृत्वाखालील शेतकरी उत्पादक कंपनी म्हणून स्वयम् सखी शेतमाल उत्पादक कंपनी लिमिटेडने गेल्या तीन वर्षांत केलेल्या व्यापक आणि प्रभावी कार्याची दखल घेत सीआयआय एफपीओ समिट २०२५ मध्ये कंपनीला राष्ट्रीय पातळीवरील विशेष मान्यता प्रदान करण्यात आली. ७६ गावांतील सुमारे १,९८० महिला शेअरहोल्डर्स, एकूण १,६७० सभासदांपर्यंत पोहोचलेले बिनव्याजी कर्ज, विविध शासकीय योजना, बँक व बाजारपेठ जोडणी, तसेच शाश्वत शेती व ग्रामीण उद्योजकतेसाठी केलेल्या कार्यामुळे हा पुरस्कार देण्यात आला.

कंपनीमार्फत ींशपर्वीी डराहळींर ठङ्क अंतर्गत २ कोटी १३ लाख १२ हजार रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज महिलांना उपलब्ध करून देण्यात आले. तसेच कृषी विभागाच्या आत्मा विभागाकडून शेतकरी सभासदांना १ कोटी १२ लाख रुपयांच्या योजना, ठिबक व स्प्रिंकलर पाईपलाईन योजनांअंतर्गत ४८५ सभासदांना सुमारे १ कोटी ५ लाख ६० हजार रुपये, बँक व बाजारपेठ जोडणीद्वारे १,२४५ शेअरहोल्डर्सना सुमारे ४ कोटी ४८ लाख रुपये, तसेच बाधलाम कामगार बायोगॅस अनुदान योजनेअंतर्गत ६६५ सभासदांना ८५ लाख ६० हजार रुपयांचे लाभ मिळवून देण्यात आले. या सर्व योजना मागील तीन वर्षांत प्रभावीपणे राबवण्यात आल्या.

याशिवाय कंपनीला प्राप्त झालेले ट्रॅक्टर व पिकअप वाहन अत्यल्प दरात सभासदांच्या वापरासाठी उपलब्ध करून देण्यात येतात. कंपनीमार्फत वेगवेगळ्या प्रकल्पांद्वारे वन-एकर मॉडेल, शेतकरी मोबिलायझेशन, बिझनेस डेव्हलपमेंट ट्रेनिंग यांसारखे उपक्रम राबवण्यात आले असून, याचा सभासदांच्या शेती व्यवसाय व दैनंदिन आर्थिक निर्णयांवर प्रत्यक्ष आणि सकारात्मक परिणाम झाला आहे.

दिल्ली येथील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे पार पडलेल्या उखख ऋझज डीााळीं २०२५ मध्ये स्वयम् सखी शेतमाल उत्पादक कंपनी लिमिटेड व तिच्या टीमला ही राष्ट्रीय मान्यता देण्यात आली. या उल्लेखनीय यशाबद्दल अंजली मसलकर आणि कंपनीच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करण्यात आले.

या समिटचे कार्यक्रमाची सुरुवात उखख चे अध्यक्ष श्री. संजय संचेती यांच्या उद्घाटनपर भाषणाने झाले. कार्यक्रमास श्री. राजेश श्रीवास्तव (चेअरमन, प्रॉवेस ग्रुप), श्री. सलील सिंगल (चेअरमन एमेरिटस, पीआय इंडस्ट्रीज), श्री. विलास विष्णू शिंदे (चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक, सह्याद्री फार्म्स), श्री. के. आर. रामलिंगम (वरिष्ठ महाव्यवस्थापक, नाबार्ड) तसेच डॉ. सुधांशू (संयुक्त सचिव, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय) हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

या मान्यवरांसमोर अंजली मसलकर यांनी स्वयम् सखी शेतमाल एफपीसीच्या उभारणीचा प्रवास, महिलांच्या सहभागातून झालेला बदल, टीमचे योगदान तसेच भविष्यातील संधी व आव्हाने याबाबत सविस्तर विचार मांडले.

शेतकरी उत्पादक कंपन्यांचे बळकटीकरण, महिलांचे नेतृत्व, बाजारपेठेशी थेट जोडणी, शाश्वत शेती आणि ग्रामीण उद्योजकतेला चालना देणे या उद्देशाने या समिटचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील यशस्वी एफपीओंचे अनुभव, धोरणात्मक चर्चा आणि भविष्यातील संधी यावर यावेळी सखोल संवाद झाला.

या यशामागे स्वयम् शिक्षण प्रयोग संस्थेच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचा मोठा वाटा असून, महिलांच्या कठोर परिश्रमांचे आणि सामूहिक नेतृत्वाचे हे फलित असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. ही राष्ट्रीय मान्यता ग्रामीण महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे.